UGC Listed Journal

मराठवाडा इतिहास परिषद,
औरंगाबाद
(रजि.नं.एफ८२०/दि.२६.०८.१९८२)

ISSN : 0976 – 5425

# History Research Journal
# इतिहास संशोधन पत्रिका

Issue. - XXV April
अंक – पंचविसावा 2021

कार्यकारी संपादक
डॉ. सोमनाथ रोडे

: संपादकीय मंडळ :

डॉ. जाकेर पठाण
डॉ. प्रभाकर मिरकड
डॉ. विनोद बोरसे
प्रा. विजय पांडे
डॉ. बब्रुवान मोरे
डॉ. सुभाष बेंजलवार

या अंकात व्यक्त केलेली विचार-मते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

# • भूमिका •

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबादचे चाळिसावे राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशन कै. बापूसाहेब एकंबेकर सेवाभावी संस्थेचे कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर जि.लातूर येथे दिनांक २४ व २५ एप्रिल २०२१ रोजी ऑन लाईन पद्धतीने संपन्न होत आहे. इतिहास परिषद ही राज्यभरातील इतिहास प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे कृतिशील व्यासपीठ म्हणून इ. स.१९८० पासून कार्यरत आहे. इतिहास विषयात नवीन साधनांद्वारा मांडणी, लिखाण, संशोधन उपलब्ध करून देण्याचे काम परिषदेच्या व्यासपीठावरून झाले आहे. मान्यवर संशोधक, अभ्यासक आणि इतिहासकारांनी अधिवेशनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याचे कार्य सातत्याने केले आहे.

संशोधनपर शोधनिबंध परिषदेने नियमितपणे प्रकाशित केले आहेत. इ. स.१९८५ ला 'निवडक शोधनिबंध' या शीर्षकाने अंकाचे प्रकाशन झाले. मात्र इ. स. १९९७ पासून परिषदेने 'इतिहास संशोधन पत्रिका'– 'History Research Journal' या नावाने शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. अध्यक्षीय भाषण, सत्राध्यक्षांची भाषणेही संशोधन पत्रिकेतून प्रकाशित करण्यात येत आहेत. १४ जून २०१९ पासून इतिहास संशोधन पत्रिकेचा समावेश UGC Care List मध्ये झालेला आहे. ही अत्यंत आनंदाची बाब आहे. परिषदेच्या व्यासपीठावरून उत्कृष्ट शोधनिबंध सादर व्हावेत म्हणून परिषदेच्या वतीने तिन्ही विभागांतून उत्कृष्ट शोधनिबंधाला रोख रु. १५०० व प्रमाणपत्राचे पारितोषिक ३७ व्या अधिवेशनापासून देण्यास सुरुवात केली आहे. इतिहास संशोधन पत्रिका प्रकाशित करण्यामागची भूमिका स्थानिक संशोधन प्रकाशित व्हावे, नवीन संशोधकांना प्रकाशनासाठी व्यासपीठ मिळावे आणि संशोधनासंदर्भात मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाव्यात अशी आहे. परिषदेच्या व्यासपीठावरून आतापर्यंत सुमारे १५८० शोधनिबंध सादर झाले. त्यांपैकी परिषदेने ७३० शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. प्रकाशनाची जबाबदारी संपादक मंडळ, इतिहास संशोधन पत्रिकेचे स्थायी सभासद, वर्गणीदार, वाचक, परिषदेचे आजीव व वार्षिक सदस्य आणि सातत्याने मौलिक आर्थिक साहाय्यता देणारी 'भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली' (आयसीएचआर) यांनी उचललेली आहे. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. चोविसाव्या अंकाचे वाचक स्वागत करतील ही अपेक्षा. मराठवाडा इतिहास परिषद कार्यकारिणी संपादक मंडळाने घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करते. मराठवाडा इतिहास परिषदेने साडेतीन दशकांचा काळ यशस्वी रीत्या पूर्ण केला आहे. आतापर्यंत परिषदेने २४ 'इतिहास संशोधन पत्रिका' इतिहासाच्या अभ्यासकांसमोर सादर केल्या याचे मनोमन समाधान वाटते. आपणा सर्वांच्या सदिच्छेच्या बळावर परिषदेची भावी वाटचाल गतिमान होईल, असा आम्हास विश्वास वाटतो.

**प्रा. विजय पांडे**
सचिव

**डॉ. जाकेर पठाण**
अध्यक्ष

**सर्व सदस्य**
**मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शीर्षक |
|---|---|---|---|
| | **प्राचीन विभाग** | | |
| १. | डॉ.अरविंद सोनटक्के | १९ | केदारेश्वर मंदिरावरील मोहिनी की काली : एक शोध |
| २. | डॉ. विजय सरडे | २३ | मत्स्येंद्रशिष्य चौरंगीनाथ |
| ३. | Mr. Ravi Dinkar Khillare | २७ | The Importance of Bhon Stupa an Overlook Buddhist Monument of Maharashtra in Ashokan Era |
| ४. | डॉ. विनोद बाबूराव बोरसे | ३२ | प्राचीनातून नामशेषाकडे – विशेष संदर्भ, पितळखोरा लेणी क्र. ०४ समोरील शिल्प |
| ५. | प्रा. संजय पाईकराव | ३७ | पैठण येथील बौद्ध परंपरा : एक शोध |
| ६. | डॉ. नारायण सूर्यवंशी | ४० | शिरूर अनंतपाळ नगरातील चालुक्यकालीन शिवालये व शिल्पवैभव |
| ७. | डॉ. नितीन बावळे, कु. मयुरी पुरजळकर | ४८ | प्राचीन आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र, तेर |
| ८. | डॉ. गणेश काशीनाथ होनराव | ५२ | ऐतिहासिक साधनांमधून आलेला कापालिक संप्रदाय |
| ९. | डॉ. कारभारी एस. वाघमारे | ५६ | ''सम्राट अशोक का धम्म : एक अध्ययन'' |
| १०. | श्री. समुद्रगुप्त पाटील | ६५ | गुजरातमधील पटान पटोला अद्भुत साड्यांचे माहात्म्यः |
| | **मध्ययुगीन विभाग** | | |
| १. | डॉ. शिवाजी वाघमोडे | ६९ | अध्यक्षीय भाषण |
| २. | डॉ. कामाजी डक | ७५ | छत्रपती संभाजी महाराज यांचा औरंगाबाद शहराशी आलेला संबंध |
| ३. | डॉ. ओमशिवा लिगाडे | ८३ | शिवकालीन न्यायदानातील फौजदारी गुन्ह्याचे संदर्भ |
| ४. | डॉ. राजेंद्र गायकवाड | ८९ | हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासाला कलाटणी देणारे पानिपत |
| ५. | श्री. दिनेश रामनाथ कचकुरे, डॉ. कृष्णा मालकर | ९४ | छत्रपती शिवाजी महाराजांची साक्षरता |

१

# केदारेश्वर मंदिरावरील मोहिनी की काली : एक शोध

✲

**डॉ. अरविंद सोनटक्के**

**दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर, जि. नांदेड**

वेद, खिलसूक्ते, षड्विंश, गृहसूत्रे, महाभारत, पाणिनीचे अष्टाध्यायी, कौटिल्याचे अर्थशास्त्र यासारख्या ग्रंथात मूर्तिपुजेचे जसे उल्लेख आढळतात तसेच अग्निपुराण, मत्स्यपुराण या पुराण ग्रंथांतही मूर्तिकलेची विपुल माहिती मिळते. भारतीय मूर्तिकलेचा इतिहास समजून घेण्यासाठी पुराणशास्त्राचा अभ्यास असणे अनिवार्य आहे. कारण देवी देवतांची नानाविध रूपे पुराणांनीच बहाल केलेली आहेत. त्यांतीलच काही रूपे धर्मापुरीच्या केदारेश्वर मंदिरावर पाहावयास मिळतात. बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील धर्मापुरीच्या मंदिरावर असलेल्या एक देवी शिल्पास मोहिनीचे शिल्प असे म्हटलेले असून हे शिल्प मोहिनीचे नसून कालीचे शिल्प आहे हे सिद्ध करणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे.

गावाजवळच एका खडकाळ शेतात चालुक्यकालीन कलेचा अप्रतिम आविष्कार असलेले केदारेश्वर मंदिर आहे. हे मंदिर म्हणजे धर्मापुरीतील जतन केलेले असे एकमेव मंदिर होय. मुखमंडप आणि धर्ममंडप पूर्णपणे भग्न अवस्थेत आहेत. मंडपाची बाह्य भिंत आता शिल्लक नाही पण त्यातील अर्ध भिंतीचा काही भाग शिल्लक आहे. मंदिराचा जो भाग शिल्लक आहे त्याची मोजमापे ५८ फूट बाय ४८ फूट अशी आहेत. मंडप, अंतराळ, गर्भकृह अशी मंदिराची रचना आहे.[१] हे केदारेश्वर मंदिर चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याने बांधल्याची नोंद आहे.[२]

मंदिर पश्चिमाभिमुख असून मंदिराच्या जंघा भागावर आकाराने पुष्ट असलेल्या शैव-वैष्णव तसेच शाक्तांची मिळून एकूण ६८ मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यातील मंदिराच्या पश्चिम-पूर्व कोपऱ्यात अर्थात आग्नेय दिशेला पूर्वेकडे तोंड करून दक्षिण दिशेकडून अनुक्रमे पाचव्या क्रमांकाची सुमारे १०२ सें.मी. उंच आणि ४६ सें.मी. रुंद अशी कालीची संहार मूर्ती आहे. सदरील मूर्तीचे वर्णन डॉ. किरण देशमुख यांनी त्यांच्या 'मराठवाड्यातील देवतांची रूपे' या पुस्तकात[३] सदरील शिल्पास मोहिनी शिल्प असल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यात असे म्हणतात की, ''भस्मासुरच्या वधाशी संबंधित मोहिनी (स्त्री) रूपातील विष्णूची सर्वांगसुंदर पण अत्यंत दुर्मिळ असलेली एकमेव मूर्ती धर्मापुरी येथील केदारेश्वर

देवळावर पूर्वाभिमुख आहे. तेथील प्रस्तुत प्रमाणबद्ध प्रतिमेत स्थानक चतुर्भुज मोहिनीने (विष्णू) डाव्या खालील हाताने समोरच्या अलिढासनातील द्विभुज असुराचे डोके पकडून उजव्या खालील हाताने त्याचा गळा पकडून जबडा फाकविला आहे. देवीने डाव्या वरील हातामधील धारदार खड्गाने दैत्यावर वार केला असून देवीचा उजवा वरील हात आयुधासह भग्न झाला आहे. उग्र चेहऱ्याच्या, उर्ध्वकेशरी असुराने डाव्या हातात तीक्ष्ण धारदार शस्त्र पकडून संरक्षणाचा पवित्रा घेतला आहे हे विशेष. मोहिनी रूपातील अलंकृत विष्णू देवाची देहयष्टी नाजूक असून कामनिय कटी, उठावदार उरोज, त्यांच्यावर स्वैरपणे रुळणारे अनेक गळाहार, मोहक चेहरा या सर्वांमुळेच तेथील विष्णूचे मोहिनी (स्त्री) रूप सहजच ओळखता येते.''[४] या संदर्भात मोहिनी रूपातील विष्णूची कथा अशी आहे की, ''भस्मासुराला मारण्यासाठी विष्णूने अतिशय आकर्षक रूप घेतलेले होते. भस्मासुरास शिवाने दिलेले वरदान असे होते की, 'तो ज्याच्या मस्तकावर हात ठेवेल तो भस्म होऊन जाईल'. वरदानाच्या प्रचीतीसाठी भस्मासुर शिवाच्याच मागे लागला. तेव्हा शिवाचे रक्षण करण्यासाठी विष्णूने मोहिनीरूप घेऊन भस्मासुरासमोर आली असता तिच्या अप्रतिम सौंदर्यावर भाळून भस्मासुराने मोहिनी समोर विवाहाचा प्रस्ताव ठेवला. त्या वेळी मी एक नर्तकी असून मला नृत्यात प्रवीण असलेल्या व्यक्तीसोबतच लग्न करावयाचे आहे, असे म्हटल्यामुळे भस्मासुराने मोहिनीस नृत्य शिकवावे अशी विनंती केली. त्याच्या विनंतीस होकार देत मोहिनी भस्मासुरास नृत्य शिकवू लागली. अशा पद्धतीने मोहिनी रूपातील श्री विष्णूने भस्मासुरास नृत्यास भाग पाडले. नृत्याच्या विविध मुद्रात मोहिनीने (विष्णूने) स्वतःच्या मस्तकावर अचानक हात ठेवला व मिळालेल्या वरदानास विसरून तसेच कृत्य भस्मासुराकडून झाले आणि स्वतःच्याच डोक्यावर हात ठेवताच भस्मासुर जागीच भस्म झाला.''[५]

वरील विश्लेषण पाहता सदरील मूर्ती ही डॉ. किरण देशमुख यांच्या मतानुसार मोहिनीची असल्याचे म्हटले असले तरी प्रत्यक्ष मूर्तीचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, ही मूर्ती मोहिनीची नसून पार्वतीचे एक रूप असलेल्या कालीचे आहे. काली ही दशमहाविद्या[#] मधील प्रथम महाविद्या होय. महाविद्या म्हणजे ब्रह्मविद्या. अग्रक्रमाने प्रथम क्रमांक असल्याने कालीस आद्यशक्ती असेही म्हणतात.[६] आद्यशक्ती महालक्ष्मी ही सर्वांगसुंदर, त्रिपुरसुंदरी, षोडशी, महाश्री, महालक्ष्मी चण्डा, चण्डिका, भद्रकाली, दुर्गा, काली, महेश्वरी, त्रिगुणा, भगवती, परा अशी अनेक नावे या देवतेस आहेत.[७] केदारेश्वर मंदिरावरील सदरील मूर्तीचे अवलोकन केले असता. श्यामारहस्य या ग्रंथातील वर्णनाप्रमाणे चतुर्भुज, बाह्यरूपिनी, मुण्डमालाविभूषित, घोर दंतावली, पुष्ट आणि

उन्नत स्तन असे वेगवेगळे वर्णन सांगितलेले आहे. ही सारी वर्णने सदरील मूर्तीस लागू होतात.[८] सदरील शिल्पात स्त्रीरूपी देवता राक्षसाचे मुख फाडून काढीत असलेले असल्याने ते शिल्प मोहिनीरूप होऊच शकत नाही तर ती काली ठरते. या शिल्पात अलिढासनातील[९] स्थानक मूर्तीत देवी 'चतुर्भुज' असून प्रदक्षिणाक्रमाने उजवा हात चेहऱ्यावरील कातडी सोलून काढीत आहे तर उजव्या वरच्या हातात त्रिशूल/वज्र किंवा खट्वांगप्रमाणे तुटलेले शस्त्र दिसते आहे. डाव्या वरच्या हाताने राक्षसाने मारलेला खड्गास वरच्यावर रोखून धरलेला असून खालच्या डाव्या हाताने राक्षसाचे केस गच्च धरलेले आहेत. देवीची शरीर रचना प्रमाणबद्ध सुंदर असली तरी बाहेर आलेले सूळे दात, त्रिशूल/वज्र किंवा खट्वांग, शरीरावर रेंगाळणारी मुंडमाला, या लक्षणांवरून ती काली असून मोहिनी ठरत नाही तसेच वामन पुराणात[१०] रुरू नावाच्या असुराने कालीवर आक्रमण केले. तिने आपल्या खट्वांगाने त्याला मारले व त्या असुराचे कानापासून पायापर्यंतचे कातडे काढून तिने आपल्या जटा बांधल्या असा उल्लेख आलेला आहे. या कथानकावरून ही मूर्ती कालीची आहे हे स्पष्ट होते. वामन पुराणातील कथानकाप्रमाणे मूर्तीतील देवीने डाव्या हाताने राक्षसाचे किंवा दैत्याचे केस धरून उजव्या हाताने त्याच्या चेहऱ्यावरील त्वचा पूर्णपणे सोलून, ओढून काढलेली आहे. त्यामुळे त्याची कवटी दिसत असून डोळेही कवटीच्या खोबणीतून बाहेर आलेले आहेत तसेच नाकाचे हाडही स्पष्ट दिसते आहे. ओढून काढलेली त्वचा गळ्याजवळ एकत्र जमलेली असून त्वचेचा नाकावरील भाग, डोळ्यांची बुबुळे असलेली पोकळ जागा तसेच ओठही कोरलेले दिसतात.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की,

१. प्रा. डॉ. किरण देशमुख यांनी मूर्तीची ओळख पटविण्याकरीता दिलेले विश्लेषण हे प्रत्यक्ष मूर्तीशी जुळणारे नाही.
२. मोहिनीने भस्मासुराला मारण्यासाठी त्याच्या शरीरास कसलाही स्पर्श केलेला नसून केवळ नृत्यात गुंतवून वरदान प्राप्त असलेला त्याचाच हात त्याच्याच डोक्यावर ठेवण्यास बाध्य करून भस्मासुरास जाळले असल्याने ही मूर्ती मोहिनीची मूर्ती म्हणताच येणार नाही.
३. वामन पुराणातील कथानक आणि पौराणिक कथेतील कालीची विविध रूपे तसेच मूर्तिशास्त्राच्या अनुषंगाने असलेली आयुधे, शरीर, रचना, मुंडमाला यांचा विचार करता ही कालीचीच मूर्ती आहे हे स्पष्ट होते.
४. कोणत्याही संहार मूर्तीमध्ये देवता आणि दैत्य यांचा संयुक्तपणे विचार करावा लागतो. या मूर्तीतील देवतेच्या ओळखीसोबतच दैत्याची ओळख पटविणे अत्यंत

आवश्यक असून सदरील शिल्पात असलेला दैत्य वामन पुराणानुसार 'रुरू' आहे.

५. काली 'रुरू' असुराचे कानापासून पायापर्यंतचे कातडे सोलून किंवा ओरबडून काढले या वामन पुराणातील उल्लेखानुसार ही मूर्ती घडविलेली असल्याने आणि प्रा. डॉ. किरण देशमुख म्हणतात त्याप्रमाणे मोहिनीने भस्मासुरचा गळा धरलेला आहे. हे विधान सदरील मूर्तीस लागू होत नसल्याने हे शिल्प मोहिनीचे नसून 'कालीचे' आहे हे संशोधनाअंती सिद्ध होते.

## संदर्भ


१. देव प्रभाकर, मराठवाड्यातील प्राचीन मंदिर, स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत प्रकाशन, पुणे, २०१७ पृ. ३८.
२. देशमुख किरण, डॉ. जगदाळे, महादेव्यैनमोनमः, निर्मल प्रकाशन, नांदेड, २०१० पृ.७२.
३. देशमुख किरण, मराठवाड्यातील देवतांची रूपे, निर्मल प्रकाशन, नांदेड, २०१७ पृ.१०७.
४. उपरोक्त, पृ.१०७-१०८.
५. www.panjabkesari.in; गणेश पुराण २.३९.२०.
६. मिश्र जनार्दन, भारतीय प्रतीकविद्या, बिहार राष्ट्रभाषा परीषद, पटना, १९६० पृ. १९०.
७. उपरोक्त, पृ.१९३.
८. उपरोक्त, पृ.१९४.
९. (पं.) जोशी महादेवशास्त्री, भारताची मूर्तिकला, अनमोल प्रकाशन, पूणे, १९८० पृ.९८; (आलिढ : एक पाय गुढघ्यात वाकवून पुढे न्यायचा तर दुसरा पाय ताठ पण तिरका ठेवायचा प्रकार)
१०. वेदान्तशास्त्री गोपालचंद्र (अनु.), वामन पुराण, (२९ : ६२-६४), भारतीय काशीराज न्यास, दुर्ग नगर, वाराणसी, शके. १८६० पृ.२३६


# काली, तारा, षोडशी, छिन्नमस्ता, बगला, कमला, मातंगी, भुवनेश्वरी, भैरवी आणि घुमावती. (पुरश्चर्यार्णव)











UGC Listed Journal : ISSN : 0976 – 5425